Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

## Multidisciplinary International Research Journal

### Human Rights : Reality & Challanges

**SPECIAL ISSUE**

December-2020




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr. Sandip B. Kale
Coordinator
HOD. Dept. Of Political Science
Yeshwant Mahavidyalaya Seloo
Dist. Wardha

**Executive Editor:**
Dr. Archana S. Dahane
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya Seloo
Dist. Wardha

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

## INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | आरोग्य आणि मानवी हक्का समोरील जागतिकीकरणाचे संकट — संदीप तुंडूरवार / डॉ. शरद सांबारे | 1 |
| 2 | समकालीन नक्षलवादी चळवळ आणि मानवी हक्क — डॉ. रतन व्ही. राठोड | 10 |
| 3 | सुशासनाच्या संदर्भात माहितीचा अधिकार आणि मानवी हक्क — डॉ. संदीप बी. काळे | 14 |
| 4 | आरोग्य कंत्राटी कर्मचारी कोरोना योद्धा आणि मानवी हक्क — प्रा. विनोद को. गायकवाड | 19 |
| 5 | भारतातील शिक्षण विषयक अधिकारचा विकास — डॉ. बी. जी जोगदंड | 23 |
| 6 | महिला आणि मानवी हक्क — प्रा. डॉ. अरुण मुकुंदराव शेळके | 27 |
| 7 | मानवाधिकाराचा जागतिक जाहीरनामा आणि भारतीय संविधान — डॉ. नरेश कवाडे | 31 |
| 8 | मानवी हक्क आणि शिक्षण — डॉ. संजय गोरे | 38 |
| 9 | महिला शोषण आणि मानवाधिकार — प्रा.डॉ.संतोष गोपालकृष्ण कुळकर्णी | 42 |
| 10 | मानवाधिकार शिक्षण : आजची सामाजिक गरज — डॉ. प्रमोदकुमार नंदेश्वर | 45 |
| 11 | मानवाधिकार आणि भारतीय संविधान — प्रा. नितिन माणिकराव बिहाडे | 48 |
| 12 | महिलांची स्थिती व मानवाधिकार — प्रा. नितेश आर. रामटेके | 52 |
| 13 | मानवी हक्क आणि शिक्षण — प्रा. डॉ. नंदाजी राघोबाजी सातपुते | 55 |
| 14 | मानवी हक्कांच्या संरक्षणात प्रसार माध्यमांची भूमिका — प्रा.डॉ. मुक्ता गोविंदराव सोमवंशी | 59 |
| 15 | लिंग समानता आणि मानवी हक्क — प्रा. विनोद मारोतराव मूडे | 65 |
| 16 | भारतीय राज्यघटना व मानवी हक्क — प्रा.डॉ. मनोज साताप्पा जाधव | 72 |
| 17 | मानवी हक्क व पर्यावरण संवर्धन — प्रा. बुध्दघोष मधुकरराव लोहकरे | 76 |
| 18 | बालकामगारासाठी मानवाधिकार: काळाची गरज — श्री. उमेश शंकरराव कुऱ्हाडे | 80 |
| 19 | मानवी हक्क आणि आदिवासी महिला लोकप्रतिनिधी — डॉ. राजेश उत्तमराव भटकर | 84 |
| 20 | महिला आणि मानवाधिकार — डॉ. योगेश म. वडतकर | 87 |
| 21 | भारतीय संविधान : आदिवासी व मानवाधिकार — प्रा. डॉ. हिराचंद चोखाजी वेस्कडे | 91 |

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# मानवी हक्कांच्या संरक्षणात प्रसार माध्यमांची भूमिका

प्रा.डॉ. मुक्ता गोविंदराव सोमवंशी
सहयोगी प्राध्यापक व लोकप्रशासन विभाग प्रमुख
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी

मानवी हक्काची संकल्पना नैसर्गिक विधी या संकल्पनेचे अपत्य आहे. प्रत्येक व्यक्तीस जन्मानेच माणूस म्हणून काही हक्क प्राप्त होतात. 'मानवी हक्क' या संकल्पनेचा सर्वप्रथम उल्लेख 'हेन्री डेव्हिडथारो' या विचारवंताने आपल्या 'डिसओबीडीयन्स'या ग्रंथात केला आणि मानवीहक्क हा शब्द प्रचलित झाला'१ मानवी हक्काची संकल्पना ग्रीक-रोमन भारतीय विचारवंतांच्या तसेच ख्रिस्ती व बौद्ध धर्माच्या तत्वज्ञानात आढळून येते. सेंट थॉमस अक्वायनस या विधिज्ञांच्या लिखाणातून ही संकल्पना अधिक स्पष्ट झाली. म्हणून त्यास मानवी हक्काचा जनक संबोधले जाते. तसेच 'सतराव्या शतकात आंतरराष्ट्रीय कायद्याचा जनक म्हणून ओळखल्या गेलेल्या ह्यूगो ग्रोशिअस यांच्या व त्यापुढे मिल्टन आणि लॉक ह्या विचारवंतांच्या लेखणीतून मांडण्यात आली'२ 'मॅग्ना कार्टा' हा कायदा म्हणजे राजसत्तेच्या अधिकारावर बंधने घालून व्यक्तीच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी निर्माण करण्यात आला. 'पिटिशन ऑफ राइट्स' १६२८ आणि 'बिल ऑफ राइट्स' १६८९ या कायद्याद्वारे ती अधिक स्पष्ट झाली. त्याच बरोबर अमेरिकन राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांती मधून मानवी हक्काला अधिक बळकटी मिळाली. भारतामध्ये प्राचीन काळापासूनच मानवी हक्कावर विचार झाला आहे. कौटिल्याने राजावर जनतेचे नियंत्रण असावे. राजा हा जनतेचा सेवक आहे. असे मत मांडले आहे. याचा अर्थ राज्यसंस्था ही मानवी हक्काचा संरक्षणासाठी असते हे स्पष्ट होते.

मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी अलीकडच्या काळात प्रसार माध्यमांचे महत्त्व अधिक वाढले आहे. मानवी हक्काचे हनन झालेल्या घटनांना जगासमोर आणण्याचे महत्त्वाचे साधन म्हणून प्रसार माध्यमांचा विचार केला जातो. आजही अविकसित तसेच विकसनशील देशांमध्ये अनेक व्यक्ती आपल्या मानवी हक्काविषयी जागरूक असल्याचे दिसत नाही, तेव्हा प्रसारमाध्यमाद्वारे नागरिकांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली जाते.

**संशोधन पद्धती**

* प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

* **तथ्य संकलन:-** प्रस्तुत शोधनिबंध लिहिण्यासाठी माहितीचे संकलन करण्याकरिता दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला असून यामध्ये संदर्भग्रंथ, मासिक, इंटरनेट इत्यादींचा समावेश होतो.

**शोधनिबंधाचे उद्देश**

१. मानवी हक्क संकल्पना स्पष्ट करणे.

२. मानवी हक्काचा संरक्षणात प्रसारमाध्यमांची भूमिका स्पष्ट करणे.

**गृहीतकृत्य:-** १. 'मानवी हक्काच्या संरक्षणाच्या दृष्टीने प्रसारमाध्यमे प्रभावी ठरत आहेत'.

Ta.Sonpeth Dist.Parbhani
Sonpeth Pin-431516
Late Ramesh Warpudkar ACS College



मानव जन्माला येताच त्यास जे हक्क प्राप्त होतात, ते मानवी हक्क होत. हे हक्क प्रत्येकास निसर्गा द्वारे प्राप्त होतात. तसेच प्राचीन काळी मानवाने आपल्या मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी एकत्रित येऊन एक संघटना स्थापन केली. या संघटनेस आपण राज्यसंस्था म्हणून ओळखतो. अर्थात राज्यसंस्था ही सुद्धा मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी नैसर्गिक पद्धतीनेच उदयास आली आहे,रुसोच्या सामाजिक कराराच्या सिद्धांतातून स्पष्ट होते, असे असले तरी इतिहासाचा आढावा घेतला असता. एका मानवाकडून दुसऱ्या मानवाचे शोषण केल्याच्या किंवा एका व्यक्ती समूहाने दुसऱ्या व्यक्ती समूहाच्या मानवी हक्काचे हनन केल्याच्या अनेक घटना इतिहासातून आढळून येतात. साम्राज्यविस्तारामधून तसेच स्वतःचे श्रेष्ठत्व निर्माण करण्याच्या उद्देशाने दुसऱ्याच्या हक्कावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न जगात सर्वत्र झाल्याचे आढळून येते. 'मानवाची प्रतिष्ठा ही त्याला प्राप्त होणाऱ्या स्वातंत्र्य आणि हक्कावर अवलंबून असते. म्हणूनच जगाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात माणसाला दास्यातून मुक्त करून, त्याला स्वातंत्र्याचा उपभोग घेता यावा यासाठी क्रांतिकारी लढा झाले आहेत'.३.भारतातही अनेक समाजसुधारकांनी यासाठी अथक प्रयत्न केले. गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज अशा अनेक महामानवांनी मानवी हक्कासाठी लढा दिला आहे. 'अमेरिकन राज्य क्रांती पासून दक्षिण आफ्रिकेच्या स्वातंत्र्य आंदोलना पर्यंतच्या प्रत्येक क्रांतीचा मूलाधार मानवी हक्काचा स्वीकार, संरक्षण आणि संवर्धन हाच होता. जगाने दोन महायुद्धाची विध्वंसकता अनुभवल्या नंतर मानवी अस्तित्वाची आणि अधिकारांची जाणीव अधिकच जागृत झाली'. ४ जागतिक व्यवस्थेच्या केंद्रस्थानी केवळ माणूस असला पाहिजे आणि मानवी हक्काचे संवर्धन करण्याचे तत्त्व जगातील प्रत्येक राष्ट्राने अंगीकारले पाहिजे. ही धारणा संयुक्त राष्ट्रसंघाच्या निर्मितीमुळे अधिक दृढ झाली. इ.स. १९४५ मध्ये स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेने १६ फेब्रुवारी १९४६ रोजी एक 'मानवी हक्क आयोग' स्थापन केला. या मानवी हक्क आयोगाने मानवी हक्काचा जाहीरनामा तयार केला. महासभेने १० डिसेंबर १९४८ रोजी हा जाहीरनामा मंजूर केला आणि १० डिसेंबर हा जागतिक मानवी हक्क दिन ओळखला जाऊ लागला.

**मानवी हक्काचा अर्थ**

मानवी हक्क म्हणजे नैसर्गिक , प्राथमिक , मूलभूत , नैतिक , घटनात्मक हक्क होय. ही सर्व संबोधने मानवी हक्कासाठी वापरली जातात. मानवी हक्क हे मानवाला त्याच्या जीवनाबरोबरच प्राप्त झालेले असतात. हे हक्क त्याला जीवन जगण्यासाठी आवश्यक असतात, म्हणून त्यास 'नैसर्गिक हक्क' असे संबोधले आहे. विविध विचारवंतांनी मानवी हक्काविषयी आपली मते मांडली आहेत. त्याचबरोबर ही संकल्पना मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

* **संयुक्त राष्ट्र संघटना**:- "एखादी व्यक्ती मनुष्य आहे या एक मात्र कारणामुळे तिला मिळणारी शक्ती म्हणजेच मानवी हक्क होय".

* **मदर तेरेसा**:- "मानवी हक्क म्हणजे सरकारने दिलेल्या सोयी- सवलती नाहीत, प्रत्येक मनुष्य प्राण्याचा तो मूलभूत अधिकार आहे".

* **मॅकफरलेन**:-."मानवी हक्क हे नैतिक हक्क असून,जे प्रत्येक स्त्री व पुरुषाला माणूस म्हणून प्राप्त होतात".

*डवार्किनः- " मानवी हक्क हे मानवाला मिळालेले असे अधिकार आहेत की, ज्या अधिकाराचे सार्वजनिक हिताचे कारण सांगून राज्यही उल्लंघन करू शकत नाही. आणि हे मानवी हक्क कोणत्याही राष्ट्रीय कायदा याशिवाय माणसाला उपभोगता येतात".

वरील व्याख्यान वरून हे स्पष्ट होते की, मानवी हक्क हे व्यक्तीला माणूस म्हणून लाभलेले हक्क आहेत. तसेच ते राज्याच्या मान्यतेशिवाय व्यक्तीला प्राप्त होतात. मानवी हक्क हे व्यक्तीच्या विकासासाठी मूलभूत स्वरूपाचे असतात. मानवी हक्कांना स्थळ, काळ व क्षेत्राचे बंधन नाही. मानवी हक्क हे वैश्विक स्वरूपाचे असून जन्माने ते प्रत्येक व्यक्तीला प्राप्त होतात. हे हक्क व्यक्तीच्या आत्म प्रतिष्ठेसाठी महत्त्वाचे असतात.'राष्ट्रीयत्व, वंश, धर्म, लिंग इत्यादींचाही पलीकडे जाऊन केवळ मानवी मूल्यांच्या आधारावर इतरांशी वर्तणूक करणे. म्हणजे मानवाने, मानवासाठी, मानवाशी वागताना वापरलेले अधिकार होय. मानवी मूल्य ही आपणाला निसर्गतः प्राप्त झालेली आहेत. आणि त्यांच्या शिवाय आपण मनुष्यप्राणी म्हणून जगूच शकत नाही. मानवाधिकार आणि मूलभूत हक्क आपल्याला पूर्ण विकसित करतात. आणि आपल्या शारीरिक, आध्यात्मिक आणि इतर गरजांच्या पूर्ततेसाठी मानवी मूल्य, आपले बुद्धिचातुर्य आणि आपली सद्सद्विवेक बुद्धी यांचा वापर करीत असतो'.५

**प्रसार माध्यमे**

प्रसारमाध्यमे ही लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून ओळखली जातात. 'लोकशाही शासन म्हणजे लोकांनी, लोकांसाठी, लोकांकडून चालविलेले शासन होय', असा लोकशाहीचा अर्थ अब्राहम लिंकन यांनी सांगितला आहे. तेव्हा या लोकशाही शासन व्यवस्थेत लोकांसाठी जेव्हा काही लोक कार्य करीत असतात. तेव्हा त्यांच्यावर अंकुश ठेवणे, तसेच त्यांच्या कार्याची दखल घेण्याच्या दृष्टीने प्रसार माध्यमे फार महत्त्वाची भूमिका बजावत असतात. त्याचप्रमाणे जगात घडणाऱ्या घडामोडी जनमानसा समोर आणण्याचे कामही प्रसारमाध्यमे करीत असतात.

**मानवी हक्क आणि प्रसार माध्यमे**

जनजागृती मध्ये प्रसार माध्यमांची भूमिका विशेष महत्त्वाची असते. 'लोकशाहीच्या परिभाषेतील 'लोक' प्रसार माध्यमांचा आत्मा असतो. लोक च्या संदर्भात प्रसार माध्यम सतर्क व सजग असतात. वृत्तपत्रे तर लोकशाहीचा चतुर्थ स्तंभ मानली जातात. लोकशाहीचे अनुबंध मानवी हक्काशी भक्कमपणे बांधलेले असतात'.६ प्रसार माध्यमांद्वारे समाजामध्ये घडणाऱ्या मानवी हक्क हननाच्या घटना उजागर केल्या जातात. मानवी हक्काच्या संरक्षणार्थ ज्या विविध उपाय योजना आहेत. त्यात प्रसारमाध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे . समाज माध्यमाद्वारे जनजागृती होऊन एक दबावगट निर्माण होतो. ज्या ज्या ठिकाणी मानवी हक्काची पायमल्ली होते, त्या त्या ठिकाणी ही प्रसारमाध्यमे दबाव निर्माण करू शकतात. मग ते अमेरिकेतील वर्णद्वेष असेल किंवा भारतातील खैरलांजी सारख्या घटना असतील. त्यावर रोखठोक भाष्य प्रसारमाध्यमांनी केले. यामुळे मानवी हक्काचे हनन करणाऱ्या लोकांना पायबंद घालण्यास मदत होते. प्रसारमाध्यमांनी स्थानिक स्तरापासून तर जागतिक स्तरापर्यंत आपला वचक निर्माण केला आहे. लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये प्रसार माध्यमे हे लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असतो. प्रसारमाध्यमांमध्ये प्रामुख्याने वृत्तपत्रेही समाजात समता, स्वातंत्र्य, बंधुता व सामाजिक न्याय या संकल्पना जनमानसात रुजविण्याचे व

Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Sonpeth Dist.Parbhani

जाणीव जागृती निर्माण करण्याचे काम फार प्रभावीपणे करीत असतात. तसेच वृत्तवाहिन्याही महत्वाची भूमिका पार पाडतात.

**वृत्तपत्रे**

वृत्तपत्र हे प्रसार माध्यमातील अधिक प्रभावी साधन आहे. कारण हे माध्यम सर्वसामान्य माणसापर्यंत पोहोचते. दैनंदिन घटनांची नोंद वृत्तपत्रात असते. यामुळे हे माध्यम लोकप्रिय आहे .स्वातंत्र्य लढ्यामध्ये अनेक भारतीयांनी स्वतःस झोकून दिले, ते केवळ या वर्तमान पत्राद्वारे झालेल्या जनजागृतीमुळेच. स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या क्रांतिवीरांच्या कार्याचा प्रचार वृत्तपत्रांमधून केला. लोकमान्य टिळक यांनी 'केसरी' हे वृत्तपत्र काढले व त्यामधून जनजागृती केली. लोकांना स्वातंत्र्याचे महत्त्व पटवून दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा 'मूकनायक' या वृत्तपत्रातून आपले विचार समाजापर्यंत पोहोचवले. प्रत्येक व्यक्तीला आपल्या मानवी हक्काची जाणीव करून दिली. म्हणूनच त्यांच्या समतेच्या व न्यायाच्या लढ्यासाठी लाखो लोक त्यांच्या पाठीशी उभे राहिले. म्हणजेच वृत्तपत्रेही व्यक्तीला त्याच्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी वापरण्यात आली. तसेच लोकमान्य टिळक यांनी असे म्हटले की, "वृत्तपत्राचा खरा उपयोग अनियंत्रित राजसत्तेला आळा घालण्यासाठी होत असतो. मानवी हक्कांच्या बाबतीत राजसत्ता जेव्हा बेजबाबदारपणे वागते तेव्हा एका पत्रकारामध्ये ती सत्ता उलथून टाकण्याची क्षमता असते". दुर्गा भागवत या संदर्भात असे म्हणतात की, "समाजाचे व्यवहार सुरळीतपणे चालण्यास मदत होईल असे लोकमत जागृत करणे, जो कोणी त्या कामी व्यत्यय आणील त्याचा वेळीच बंदोबस्त करणे हे वृत्तपत्राचे मुख्य कार्य आहे. आधुनिक काळात मानवी हक्काच्या बाबतीत लोकजागृती करणे, शासनाला वठणीवर आणणे यासाठी स्थानिक पातळीपासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत वृत्तपत्रांनी आपला दबदबा निर्माण केला आहे. वृत्तपत्राचा वचक असल्यामुळे मानवी हक्काच्या उल्लंघनावर मर्यादा येतात. मानवी हक्काचे रक्षण करण्यात वृत्तपत्रे महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

**वृत्तवाहिन्या द्रु**

दृक-श्राव्य साधन म्हणून वृत्तवाहिन्यांना प्रसार माध्यमांमध्ये फार महत्व प्राप्त झाले आहे. तसेच या वृत्तवाहिन्यांवरून प्रत्यक्ष घडलेल्या घटनांचा वृत्तांत, संबंधित व्यक्तीची माहिती प्रत्यक्षात दिली जाते. त्यामुळे हे साधन अधिकच प्रभावी ठरले आहे. आज बहुतांश लोकांकडे दूरदर्शन व विविध वृत्तवाहिन्या पाहण्याची व्यवस्था आहे. त्यामुळे वृत्तवाहिन्यांवरून दिल्या जाणाऱ्या माहितीचा प्रभाव पडत आहे. यामध्ये पूर्णवेळ काम करणारे 'आजतक'ही एक सर्वोत्कृष्ट वृत्तवाहिनी म्हणून ओळखली जाते. कारण सडेतोडपणे वास्तव माहिती मांडली जाते. तसेच आज खूप मोठ्या प्रमाणात विविध भाषेतील वृत्तवाहिन्या सुरू झालेल्या आहेत. भारतीय दूरदर्शनने 'सत्यम शिवम सुंदरम्' हे घोषवाक्य घेऊन संपूर्ण भारतीय जनतेचा विश्वास संपादन केला. पूर्वी दूरदर्शन वरून येणाऱ्या बातम्या लोक उत्सुकतेने पाहत असत. त्यासोबतच मनोरंजनात्मक कार्यक्रम देऊन लोकजागराचे प्रबोधन व मानवी हक्क अबाधित राखण्याचे काम दूरदर्शन करीत आहे. एकंदरीत वृत्तवाहिन्याचा एक दबावगट निर्माण झाला असून, सर्व संस्थांवर वचक निर्माण केला आहे.

Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Sonpeth Dist.Parbhani

समाज माध्यमे

अलीकडच्या काळात समाज माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. समाज माध्यमामधूनही मानवी हक्क संरक्षणाच्या दृष्टीने कार्य होत आहे. मानवी हक्काचे उल्लंघन झाल्याच्या घटना वाऱ्यासारख्या सर्वत्र पसरतात. यामधून संबंधित व्यक्तीला न्याय मिळावा, म्हणून समाज माध्यमांद्वारे देखील मानवी हक्काचे हनन करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थांवर दबाव आणला जातो. अथवा अशा व्यक्तीच्या विरोधात समाजात तीव्र असंतोष निर्माण होऊन,संबंधित अन्यायग्रस्त व्यक्तीला न्याय मिळवून देण्यासाठी लोक आंदोलन करण्यासाठी रस्त्यावर उतरतात. या माध्यमांचा मानवी हक्क संरक्षणासाठी उपयोग होत आहे. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरुद्ध सोशल मीडिया वरून खूप मोठ्या प्रमाणात असंतोष व्यक्त करण्यात आला. परिणामी अशा घटना समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचतात. सोशल मीडियाद्वारे आपल्या मानवी हक्काच्या दृष्टीने लोकांमध्ये जनजागृती होण्यास मदत होत आहे. परंतु सोशल मीडियावर माहिती प्रसारित करीत असताना प्रत्येक व्यक्तीने त्या माहितीची शहानिशा करणे आवश्यक आहे. अन्यथा याचे वाईट परिणाम होऊ शकतात.

प्रसार माध्यमे ही मानवी हक्काच्या बाबतीत एक संरक्षण यंत्रणा म्हणून कार्यरत आहेत. मानवी हक्काच्या दृष्टीने जनजागृती करणे, तसेच मानवी हक्काचे हनन झाले, असता त्यावर प्रहार करते. म्हणून मानवी हक्काच्या संदर्भात प्रसार माध्यमे संरक्षक ढाल समजले जातात.

प्रसारमाध्यमांनी कोणत्याही दबावाखाली न येता आपली भूमिका पार पाडणे आवश्यक आहे. परंतु अलीकडच्या काळात काही वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या काही विशिष्ट व्यक्तींच्या, पक्षाच्या अथवा संस्थेच्या म्हणून कार्य करताना दिसून येतात. या पद्धतीची प्रसारमाध्यमेही मानवी हक्काच्या संरक्षणासाठी तसेच लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून उपयुक्त ठरू शकतील का? असा प्रश्न उपस्थित होतो.

वृद्ध ,महिला, कामगार, बालक, अपंग, बालकामगार, अनाथ आश्रमामधील व्यक्ती.... या सर्वांच्या मानवी हक्काला कोणी बाधा निर्माण केली, तर त्या व्यक्ती अथवा संस्थेच्या विरोधात जाऊन संबंधित व्यक्ती वा व्यक्ती समूहाच्या मानवी हक्काचे संरक्षण प्रसारमाध्यमांकडून केले जाते .जेथे अद्याप प्रकाश पोहोचू शकलेल्या नाही त्या ठिकाणी ही प्रसारमाध्यमे पोहोचत आहेत व तेथील व्यक्तीच्या मानवी हक्काचे संरक्षण केले जात आहे. एखाद्या देशात विशिष्ट समूहाचा लोकांवर अन्याय झाला तर प्रसार माध्यमांद्वारे ही बाब मानवी हक्क आयोगाच्या निदर्शनास आणून दिली जाते. तसेच जेव्हा प्रसार माध्यमे या बाबतीत लक्ष घालतात, तेव्हा मानवी हक्क आयोगालाही या बाबींची दखल घ्यावीच लागते.

प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यासाठी 'मानवी हक्काच्या संरक्षणाच्या दृष्टीने प्रसारमाध्यमे प्रभावी ठरत आहेत'. हे गृहीत कृत्य निश्चित करण्यात आले होते ते वरील विवेचनावरून सत्य असल्याचे सिद्ध होते.

उपरोक्त विवेचनावरून प्रस्तुत शोधनिबंधातून खालील काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष प्राप्त होतात.

१. आधुनिक युगात जागतिक स्तरावर प्रसार माध्यमांचे महत्त्व वाढले आहे.

२. मानवी हक्काच्या दृष्टीने प्रसार माध्यमे सजग असून त्यांची जोपासना केली जात आहे.

३. प्रसार माध्यमे ही मानवी हक्काची संरक्षक ढाल बनवून कार्यकरतात.

'B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) –7.675, Issue NO, 257
ISSN : 2278-9308
December,2020

४. प्रसार माध्यमे मानवी हक्काच्या संरक्षणा बरोबरच जनजागृतीचे महत्त्वाचे कार्य करतात.

५. प्रसार माध्यमांचा सर्वत्र वचक निर्माण झाला आहे.

६. मानवी हक्क हे व्यक्तीचे उपजत हक्क असून, त्यास जीवन जगण्यासाठी ते अत्यावश्यक असतात.

७. मानवी हक्क हे प्रत्येक व्यक्तीस जीवन जगण्यासाठी प्राप्त झालेले शस्त्र आहे.

८. लोकशाही शासन व्यवस्था असलेल्या देशात मानवी हक्काचे उल्लंघन होण्याचा धोका कमी असतो.

९. अलिकडच्या काळात सोशल मीडिया मानवी हक्काच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे.

सारांश :- वरील विश्लेषणावरून मानवी हक्क व प्रसार माध्यमे ही लोककल्याणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहेत .मानवी हक्कामुळे व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घेता येतो. तर प्रसारमाध्यमेही व्यक्तीला त्याच्या हक्कापासून वंचित ठेवणाऱ्या घटकांवर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. म्हणूनच प्रसारमाध्यमेही कोणत्याही राजकीय पक्षाशी बांधील असता कामा नये. अन्यथा प्रसारमाध्यमांच्या कार्यावर मर्यादा येण्याचा धोका वाढतो. थोडक्यात मानवी हक्काच्या संदर्भात प्रसारमाध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ती भूमिका बहुतांश प्रमाणात सकारात्मक पद्धतीने पार पाडतात, हे स्पष्ट होते.

संदर्भसूची

१.डॉ. प्रतिभा पाटील व अंबादास आरगडे- भारतीय प्रशासन, आदित्य प्रकाशन, लातूर, जुलै२०१२,पृ.क्र.१०४.

२. मराठी विश्वकोश, ऑनलाइन

३.डॉ. राजशेखर सोलापुरे- मानवी हक्क आणि समाज, अरुणा प्रकाशन, लातूर,२०१४ पृ.क्र.९.

४. उपरोक्त पृ.क्र.९.

५. जयदीप गोविंद- योजना, एप्रिल २०२०पृ.क्र.५.

६.डॉ. दिवाकर इंगोले -मानवी हक्क आणि प्रसार माध्यमे -कुमार बोबडे, संपादित ,गौरव प्रकाशन ,औरंगाबादपृ.क्र.९

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani